प्रेसनोट दि. १३/०३/२०२४

## मंडल अधिकारी कार्यालय, थेऊर, ता. हवेली, जि. पुणे येथील मंडल अधिकारी व खाजगी इसमावर लाच मागणीस प्रोत्साहन देवून, लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १४५/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती. जयश्री कवडे, पद - मंडल अधिकारी थेऊर, ता. हवेली, जि. पुणे. (वर्ग-३)<br>२) योगेश कांताराम तातळे, वय २२ वर्ष, व्यवसाय – खाजगी संगणक ऑपरेटर रा. चौधरी पार्क, बाळु कदम चाळ, दिघी, पुणे. (खाजगी इसम)<br>३) विजय सुदाम नाईकनवरे, वय ३८ वर्ष, व्यवसाय – एजंट, रा. नागपुर चाळ, येरवडा, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ७,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ७,०००/- रुपये (सात हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १२/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | १२/०३/२०२४ |

ठिकाण :- दिनांक १२/०३/२०२४ रोजी थेऊर मंडल अधिकारी कार्यालयाचे आवारात, ता. हवेली, जि. पुणे..

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या आजीच्या आईच्या वडीलांचे नावे मौजे कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे येथे असलेल्या शेतजमीनीचे ७/१२ उता-यावरील नाव कमी झाल्याचे दिसुन आल्याने, त्या नावाची नोंद पुर्नःस्थापीत करण्यासाठी तक्रारदार यांची आजी व तिच्या बहिर्णींनी मा. तहसिलदार, हवेली, पुणे यांचेकडे रितसर अर्ज केला होता. सदर अर्जावर तहसिलदार हवेली यांनी, तक्रारदार यांच्या आजीच्या आईच्या वडीलांच्या नावाची ७/१२ उता-यावर नोंद करण्यासाठी गाव कामगार तलाठी कोलवडी व मंडल अधिकारी थेऊर यांना आदेश दिले होते. सदरबाबत गावकामगार तलाठी यांनी घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे ती नोंद मंजुर करण्यासाठी तक्रारदार हे मंडल अधिकारी थेऊर कार्यालय येथे लोकसेविका जयश्री कवडे यांना भेटले असता, लोकसेविका जयश्री कवडे यांनी क्र. ३ खाजगी इसम विजय नाईकनवरे यास भेटण्यास सांगितले. खाजगी इसम क्र. ३ विजय नाईकनवरे यानी तक्रारदार यांचेकडे फेरफार नोंदीप्रमाणे आजीच्या आईच्या वडीलांची नोंद मंजुर करण्यासाठी लोकसेविका जयश्री कवडे यांचेकरीता १०,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, मंडल अधिकारी कार्यालय, थेऊर कार्यालयामध्ये खाजगी इसम क्र. २ योगेश तातळे व क्र. ३ विजय नाईकनवरे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष तक्रारदार यांची आजीच्या आईच्या वडीलांचे नावाची फेरफार नोंद मंजूर करण्यासाठी लोकसेविका जयश्री कवडे यांचेकरीता तडजोडीअंती ७,०००/- रुपयाची लाच रकमेची मागणी केली व त्यास क्र. २ योगेश तातळे यांनी दुजोरा दिल्याने, खाजगी इसम क्र. ३ विजय नाईकनवरे यांनी ७,०००/- रु. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली व लोकसेविका क्र. १ जयश्री कवडे यांनी खाजगी इसम क्र. २ तातळे व क्र. ३ नाईकनवरे याच्या लाच मागणीस व लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन खाजगी इसम क्र. २ तातळे व क्र. ३ नाईकनवरे याना ताब्यात घेण्यात आले असून, त्या तिघांविरुद्ध लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.